मंगळवार दि. २५ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३५४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करा

### खासदार डॉ. कल्याण काळेंची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात चालू खरीप हंगामात अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नसून पावसामध्ये मोठ्या प्रमाणात खंड पडल्याने शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. काही भागांत पिके हिरवीगार दिसत असली तरी जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असल्याने पिकांची वाढ खुंटली आहे. परिणामी खरीप उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचा दावा जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील सद्यस्थितीचे तातडीने वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून दुष्काळ जाहीर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



खासदार डॉ. काळे यांनी निवेदनात म्हटले आहे की, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका यांसह विविध खरीप पिकांवर पावसातील दीर्घ खंडाचा गंभीर परिणाम झाला आहे. पावसाने उघडीप दिल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून पिकांच्या वाढीचा वेग मंदावला आहे. काही ठिकाणी पिके वरून हिरवी दिसत असली तरी त्यांच्या वाढीवर आणि उत्पादनक्षमतेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

**पावसातील मोठ्या खंडामुळे खरीप पिकांची वाढ खुंटली; ऊस, फळबागांनाही फटका; १६ गावे व १३ वाड्यांना २८ टँकरने पाणीपुरवठा**

केवळ पिके हिरवी दिसत आहेत म्हणून परिस्थिती समाधानकारक आहे, असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल, असेही डॉ. काळे यांनी स्पष्ट केले आहे. पिकांच्या सद्यस्थितीचे मूल्यांकन करताना पावसातील खंड, जमिनीतील आर्द्रता, पिकांची वाढ, उपलब्ध पाणीसाठे आणि अपेक्षित उत्पादनातील घट या सर्व बाबींचा एकत्रित विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडदावर संकट**

जालना जिल्ह्यात खरीप हंगामात मोठ्या क्षेत्रावर सोयाबीन आणि कापसाची लागवड केली जाते. याशिवाय तूर, मूग *(पान २ वर)*

## मृत्यूच्या उंबरठ्यावरुन जीवनाकडे; चंदनझिरा पोलिसांच्या संवेदनशील संवादाने महिलेचे प्राण वाचवले



### *पतीसोबतच्या वादातून भावनिकदृष्ट्या खचलेल्या महिलेचा मोती तलावात आत्महत्येचा प्रयत्न*

**जालना - प्रतिनिधी**

क्षणिक राग, दुःख किंवा भावनिक उद्रेकाच्या भरात घेतलेला निर्णय संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो; मात्र अशाच निर्णायक क्षणी एखाद्याला मिळालेला आधार, संयमी संवाद आणि माणुसकीचा हात जीवन वाचवू शकतो. जालना शहरातील मोती तलाव परिसरात २४ ऑगस्ट रोजी घडलेल्या घटनेत चंदनझिरा पोलिसांनी याच संवेदनशीलतेचा प्रत्यय देत आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या एका महिलेचे प्राण वाचवले.

पतीसोबत झालेल्या वादातून भावनिकदृष्ट्या खचलेल्या महिलेने मोती तलाव परिसरात आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी विलंब न करता पोलीस पथकाला घटनास्थळी रवाना केले.

पोलिसांचे पथक मोतीबाग परिसरात पोहोचले तेव्हा संबंधित महिला भावनिकदृष्ट्या अत्यंत अस्वस्थ अवस्थेत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. अशा परिस्थितीत घाईगडबड, दबाव किंवा कठोरपणा दाखविल्यास परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता होती.

हे ओळखून पोलिसांनी संयमाने परिस्थिती हाताळण्याचा निर्णय घेतला. महिलेवर कोणताही दबाव न आणता तिच्याशी शांतपणे संवाद साधण्यात आला. तिच्या मनातील भावना समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात *(पान २ वर)*

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी-टाटा ट्रस्टच्या करारातून 'रूग्णांना' दिलासा

### पहिल्याच करारातून ८९.६० लाखांची मदत

**मुंबई - प्रतिनिधी**

यकृत प्रत्यारोपण, कर्करोग आणि मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या महागड्या उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्ट यांच्यात करण्यात आलेला पहिलाच सामंजस्य करार राज्यातील गरजू रुग्णांसाठी दिलासादायक ठरत आहे. या करारामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळत असून रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या करारानंतर अवघ्या सहा महिन्यांत राज्यातील विविध भागांतील ९ रुग्णांना ८९ लाख ६० हजार ३०१ रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या मदतीतून यकृत प्रत्यारोपण, कर्करोगावरील उपचार, मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या अत्यंत खर्चिक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. पहिल्यांदाच झालेल्या या कराराअंतर्गत राज्यातील १५० गरजू रुग्णांना दुर्धर आणि गंभीर आजारावर उपचारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी वैद्यकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, अशाच प्रकारचे करार इतर अनेक नामांकित संस्थांसोबतही प्रक्रियेत असून ते लवकरच पूर्णत्वास येणार आहेत. त्यामुळे राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून शासन, सामाजिक संस्था आणि आरोग्य क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या रुग्णांना नवे जीवन मिळण्यास मदत होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामंजस्य करार करण्यात आला. याच धर्तीवर इतरही अनेक *(पान २ वर)*

## जालना पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**जालना -प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्र वाढविणे आणि आगामी पिढ्यांसाठी सुरक्षित व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने जालना पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू यांच्या हस्ते विविध वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी 'ग्रीन फाउंडेशन'च्या अध्यक्षा सौ. वीणिता भंडारी तसेच प्रकाश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता लावलेल्या प्रत्येक रोपाचे नियमित संगोपन आणि संरक्षण करणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून या उपक्रमात वृक्षलागवडीसोबतच पुढील काळात झाडांची देखभाल करण्यावर भर देण्यात आला.

शहरांमध्ये वाढती लोकसंख्या, काँक्रिटीकरण, वाहनांची वाढती संख्या आणि कमी होत जाणारे हरित क्षेत्र यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. वाढते तापमान, प्रदूषण आणि बदलते हवामान यांचा परिणाम सर्वसामान्यांच्या आरोग्यावरही होत आहे.

अशा परिस्थितीत शासकीय कार्यालयांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून उपलब्ध जागेचा हरित विकासासाठी उपयोग करणे गरजेचे आहे. पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात करण्यात आलेल्या वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश देण्यात आला.



पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू यांच्या हस्ते वृक्षारोपण

पोलीस प्रशासनाच्या दैनंदिन कायदा-सुव्यवस्था आणि गुन्हेगारी नियंत्रणाच्या कामासोबतच सामाजिक आणि पर्यावरणीय उपक्रमांमध्येही सहभाग वाढणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

**'ग्रीन फाउंडेशन'चे वृक्षसंवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य**

या उपक्रमात सहभागी झालेल्या 'ग्रीन फाउंडेशन'च्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येत आहे. संस्थेच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर आणि पैठण परिसरात आतापर्यंत सुमारे एक लाख वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे. विशेष म्हणजे वृक्षारोपण केल्यानंतर त्यांची देखभाल आणि संरक्षण याकडेही संस्थेने लक्ष दिले आहे. लागवड करण्यात आलेल्या वृक्षांपैकी सुमारे ८० टक्के वृक्षांचे यशस्वी संगोपन करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. *(पान २ वर)*

## डफरीन हॉस्पिटल मधील दुर्दैवी घटनेची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडून गंभीर दखल : डॉ. संजय लाखेपाटील

### *चौकशी प्रक्रियेत स्वतंत्र तज्ज्ञांचा समावेश करण्याची मागणी*

**जालना -प्रतिनिधी**

: डफरीन हॉस्पिटलमध्ये घडलेल्या दुर्दैवी घटनेची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली असून, आयोगाच्या वतीने सदस्य प्रवीण भुजाडे यांनी आज घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्यासमवेत घटनास्थळाची पाहणी करण्यात आली. तसेच संबंधित अधिकारी व यंत्रणांकडून घटनेची पार्श्वभूमी, सद्यस्थिती आणि करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती जाणून घेण्यात आली, अशी माहिती महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण





आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिली.

घडलेली घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची असल्याने अमरावती जिल्हाधिकाऱ्यांनी उच्चस्तरीय चौकशीचे निर्देश दिले असून, संपूर्ण घटनेचा सविस्तर अहवाल तीन दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश संबंधित चौकशी समितीला दिले आहेत. सदर समितीच्या कक्षेतील चौकशी प्रक्रिया अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि वस्तुनिष्ठ व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने चौकशी समितीमध्ये संबंधित विभागाच्या यंत्रणांव्यतिरिक्त स्वतंत्र बाह्य तज्ज्ञ यंत्रणा अथवा विषयातील तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

घटनेच्या सर्व पैलूंची सखोल तपासणी होऊन वस्तुस्थिती कोणत्याही दबावाशिवाय आणि निष्पक्षपणे समोर येणे आवश्यक असल्याचे आयोगाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे, असेही डॉ. लाखेपाटील यांनी म्हटले आहे. बालकांच्या सुरक्षिततेशी संबंधित कोणतीही घटना ही अत्यंत संवेदनशील आणि गंभीर बाब आहे. त्यामुळे या घटनेमागील सत्य परिस्थिती समोर आणणे, जबाबदारी निश्चित करणे तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असल्याचेही आयोगाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. याच संदर्भात *(पान २ वर)*

## श्रीक्षेत्र रामेश्वरीचा शेगावच्या धर्तीवर कायापालट करणार

### १०० कोटींचा निधी आणण्याचे आ. अर्जुनराव खोतकरांचे आश्वासन

**जालना - प्रतिनिधी**

मौजपुरी परिसरातील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या श्रीक्षेत्र रामेश्वरी महादेव मंदिराच्या विकासाला आता आणखी गती मिळणार असून, मंदिर परिसरातील पेव्हर ब्लॉक, डोम, पूल, संरक्षक भिंत तसेच निरखेडा ते रामेश्वरी मंदिर रस्त्यासह विविध पायाभूत सुविधांच्या प्रस्तावित कामांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याची घोषणा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केली. दुसऱ्या श्रावण सोमवारी (ता. २४) मौजपुरी येथे रामेश्वरी मंदिर परिसरात आयोजित विकासकामांच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

आमदार खोतकर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या विविध विकासकामांचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये आरओ फिल्टर, सौर पथदिवे, दोन सभागृहांचे



बांधकाम, शाळेच्या खोलीचे बांधकाम तसेच शाळा खोली दुरुस्ती आदी कामांचा समावेश असून, या कामांसाठी एकूण ८१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

श्रीक्षेत्र रामेश्वरी महादेव मंदिराला परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून विशेष महत्त्व आहे. श्रावण महिन्यात तसेच महाशिवरात्री आणि इतर धार्मिक पर्वांच्या काळात मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होत असते. त्यामुळे मंदिर परिसरात भाविकांना आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज अनेक वर्षांपासून व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे, डोम उभारणे, पूल बांधणे, संरक्षक भिंत उभारणे तसेच मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची सुधारणा करण्याच्या कामांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या कामांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा आमदार खोतकर यांनी केली. यामुळे मंदिर परिसराचा विकास होण्याबरोबरच भाविकांची गैरसोय कमी होण्यास मदत होणार *(पान २ वर)*

# संपादकीय...

## आता श्रेयवाद नव्हे, तर प्रत्यक्ष कामाची वेळ!

जालना शहरातील मोतीबाग तलाव परिसरात प्रस्तावित विपश्यना केंद्र तथा 'भीम पार्क' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांची नाहरकत प्रमाणपत्राची () प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रशासकीय पातळीवर रखडलेल्या या प्रस्तावाला आता पुढे जाण्याची संधी मिळाली आहे. ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे.

मात्र, मिळाली म्हणजे 'भीम पार्क' उभे राहिले असे नाही. उलट आता खरा कस लागणार आहे. जमीन, ठराव, निधी, आराखडा, प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक मान्यता, कार्यान्वयन संस्था आणि भविष्यातील देखभाल या प्रत्येक टप्प्यावर स्पष्ट निर्णय घ्यावे लागणार आहेत. मोतीबाग तलावाची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असली तरी सातबारा उताऱ्यावर जमीन महाराष्ट्र शासनाच्या नावावर असल्याने प्रशासकीय पेच निर्माण झाला होता. सर्व्हे क्रमांक ५०६ मधील ८१.२७ हेक्टर जमीन १९९० मध्ये तत्कालीन नगर परिषदेकडे ताब्यात देण्यात आल्याचे सांगितले जाते.

यामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतोजमीन प्रत्यक्ष कोणाच्या ताब्यात आणि कायदेशीर नोंद कोणाच्या नावावर? या प्रश्नाचे कायमस्वरूपी निराकरण झाले पाहिजे. केवळ एखाद्या विशिष्ट प्रकल्पासाठी देऊन भविष्यात पुन्हा मालकी, वापराचा अधिकार किंवा प्रशासकीय मंजुरीचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. विपश्यना केंद्र, तथागत गौतम बुद्धांचा पूर्णाकृती पुतळा आणि परिसराचा विकास अशी संकल्पना निश्चितच व्यापक आहे. पण हा प्रकल्प केवळ पुतळा उभारणे आणि परिसर सुशोभित करणे एवढ्यावर थांबला, तर त्याचे सामाजिक महत्त्व मर्यादित राहील.

भीम पार्क हे जालन्यातील नागरिकांसाठी शांतता, चिंतन, सामाजिक समता, बौद्ध विचार, संविधानिक मूल्ये आणि सार्वजनिक सहभागाचे केंद्र बनू शकते. त्यासाठी दर्जेदार उद्यान व हिरवळ, विपश्यना व ध्यानासाठी योग्य सुविधा, वाचन व अभ्यासाची जागा, संविधान व सामाजिक परिवर्तनावर माहिती केंद्र, दिव्यांगांसाठी सुलभ सुविधा, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरक्षित परिसर, पुरेशी प्रकाशव्यवस्था, स्वच्छतागृहे व पिण्याचे पाणी,

वाहनतळ, सुरक्षा व्यवस्था यांचा आराखड्यात विचार होणे आवश्यक आहे. प्रकल्प मोठा असण्यापेक्षा तो नागरिकांच्या उपयोगाचा किती आहे, हे महत्त्वाचे आहे.

कार्यान्वयन एजन्सी मनपाच का असावी?

माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी विकासकामांची कार्यान्वयन एजन्सी जालना महानगरपालिकाच असावी, अशी भूमिका मांडली आहे. या मागणीमागील तर्क दुर्लक्षित करता येणार नाही. बाहेरील यंत्रणेने प्रकल्प उभारून तो महानगरपालिकेकडे हस्तांतरित केला, तर पुढे देखभाल, स्वच्छता, सुरक्षा, वीज, उद्यान व्यवस्थापन आणि दुरुस्तीचा भार मनपावर येणार आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच महानगरपालिकेचा सहभाग असेल तर प्रकल्पाच्या उभारणीपासून देखभालीपर्यंत जबाबदारीची साखळी स्पष्ट राहू शकते.

पण याच ठिकाणी दुसरा प्रश्नही आहे मनपाकडे तेवढे मनुष्यबळ आणि आर्थिक क्षमता आहे का? मनुष्यबळ नाही तर नवी मालमत्ता 'ओझे' ठरू शकते जालना महानगरपालिकेत विविध विभागांमध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्याचे स्वतः गोरंट्याल यांनी निदर्शनास आणून दिले आहे. स्वच्छता, उद्यान, कार्यालयीन कामकाज आणि इतर नागरी सेवांवर आधीच मनुष्यबळाचा ताण असेल, तर नव्या प्रकल्पाची जबाबदारी स्वीकारताना त्यासाठी स्वतंत्र मनुष्यबळाची तरतूद करावी लागेल. अन्यथा आज सुंदर दिसणारा प्रकल्प काही वर्षांत अव्यवस्थित, अस्वच्छ आणि देखभालीअभावी दुर्लक्षित परिसर बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच 'भीम पार्क'च्या मंजुरीसोबतच देखभाल निधी आणि मनुष्यबळाचा स्वतंत्र आराखडा तयार करणे आवश्यक आहे. राजकीय श्रेयासाठी संघर्ष करण्यापेक्षा सर्व पक्षांनी आणि लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला तर जालन्याच्या सार्वजनिक जीवनाला त्याचा अधिक फायदा होईल. 'भीम पार्क' हा नावापुरता उद्यान प्रकल्प न राहता जालना शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीचा भाग बनू शकतो. विपश्यना केंद्र आणि गौतम बुद्धांचा पुतळा यामुळे त्याला आध्यात्मिक आणि वैचारिक परिमाण मिळू शकते. मात्र त्याची खरी ओळख समता, शांतता, ज्ञान आणि संविधानिक मूल्यांचे सार्वजनिक केंद्र म्हणून निर्माण झाली तरच या प्रकल्पाचे महत्त्व वाढेल. जिल्हाधिकाऱ्यांची हा अडथळा दूर करणारा महत्त्वाचा टप्पा आहे. पण आता फाईल एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात फिरण्याची वेळ संपली पाहिजे. 'भीम पार्क'चा मार्ग मोकळा झाला आहे; आता तो प्रत्यक्षात नागरिकांसाठी खुला करण्याची वेळ आली आहे. जालनेकरांना घोषणा नकोत. नकाशावरचा प्रकल्प प्रत्यक्ष जमिनीवर दिसायला हवा.

# पान १ वरुन...

### जालना जिल्ह्यात...

उडीद आणि मका ही पिकेही मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. मात्र पेरणीनंतर काही काळ पाऊस झाल्यानंतर पुन्हा दीर्घ खंड पडल्याने अनेक भागांमध्ये पिकांना आवश्यक ओलावा मिळालेला नाही.

पावसाची प्रतीक्षा करत असलेल्या शेतकऱ्यांची चिंता वाढली असून पिकांना वेळेवर पाणी न मिळाल्यास उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः हलक्या व मध्यम जमिनीतील पिकांवर पावसातील खंडाचा परिणाम अधिक जाणवत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**ऊस व फळबागांनाही मोठा फटका**

खरीप पिकांबरोबरच जिल्ह्यातील ऊस पिकालाही पावसाअभावी फटका बसला आहे. पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने ऊसाची अपेक्षित वाढ होत नसून उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील फळबागायतदार शेतकऱ्यांसमोरही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पाण्याअभावी फळझाडांची वाढ, फळधारणा आणि उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे फळबागांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनासमोरील महत्त्वाची बाब असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

**पाणीटंचाईचे संकट आतापासूनच गंभीर**

जिल्ह्यात सध्या १६ गावे आणि १३ वाड्यांना २८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. याशिवाय ३० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. पावसाने आणखी दडी मारल्यास पिण्याच्या पाण्याची समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांसाठी चारा आणि पाण्याची उपलब्धता हा देखील आगामी काळात गंभीर प्रश्न ठरू शकतो. त्यामुळे परिस्थिती गंभीर होण्याची वाट न पाहता प्रशासनाने आतापासूनच पूर्वतयारी करावी, अशी मागणी खासदार डॉ. काळे यांनी केली आहे.

**सर्व तालुक्यांत वस्तुनिष्ठ सर्वेक्षणाची मागणी**

दुष्काळसदृश परिस्थितीचे वास्तव चित्र समोर आणण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तातडीने क्षेत्रीय सर्वेक्षण करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या सर्वेक्षणात तालुकानिहाय पर्जन्यमान, पावसातील खंडाचा कालावधी, जमिनीतील ओलाव्याची सद्यस्थिती, विविध पिकांची वाढ, पिकांची संभाव्य उत्पादनक्षमता, उपलब्ध पाणीसाठे, पिण्याच्या पाण्याची परिस्थिती, जनावरांसाठी उपलब्ध चारा व पाणी या बाबींचा सविस्तर आढावा घ्यावा, असे खासदार डॉ. काळे यांनी म्हटले आहे.

**खरीप पिकांसह ऊस व फळबागांचे पंचनामे करा**

खरीप पिकांचे पंचनामे करण्याबरोबरच ऊस आणि फळबागांचेही स्वतंत्रपणे पंचनामे करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. पिकांचा केवळ बाह्य हिरवेपणा न पाहता जमिनीतील ओलावा, पावसातील खंड, पिकांची वाढ आणि भविष्यातील उत्पादनातील संभाव्य घट या निकषांवर पीकस्थितीचे मूल्यांकन करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. तालुकानिहाय पीकस्थितीचा अहवाल तयार करून तो तातडीने शासनाकडे सादर करावा आणि जालना जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव पाठवावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यात दुष्काळ जाहीर झाल्यास शासनाच्या नियमानुसार शेतकऱ्यांना पीकनुकसान भरपाई, पीकविमा लाभ, पाणी व चारा उपलब्धता, कृषी निविष्ठांबाबत मदत तसेच इतर अनुज्ञेय सवलती व उपाययोजनांचा लाभ तातडीने मिळवून द्यावा, अशी मागणी खासदार डॉ. काळे यांनी केली आहे. याशिवाय आगामी काळात पावसाची परिस्थिती आणखी प्रतिकूल झाल्यास पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि शेतीसाठी उपलब्ध पाणी यांची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन प्रशासनाने पूर्वतयारीचा आराखडा तयार करावा, अशी सूचनाही त्यांनी केली आहे. ''परिस्थिती हाताबाहेर जाण्याची वाट न पाहता प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवालाच्या आधारे तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संकटाच्या काळात प्रशासनाने दिलासा देण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी,'' असे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

त्यामुळे आता प्रशासनाकडून जिल्ह्यातील प्रत्यक्ष पीकस्थितीचे किती गांभीर्याने सर्वेक्षण केले जाते आणि शासनाकडे दुष्काळ जाहीर करण्यासाठी कोणता अहवाल पाठविला जातो, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. दुष्काळसदृश परिस्थितीचे तातडीने मूल्यांकन करून शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा मार्ग मोकळा करावा, हीच मागणी या वेळी उपस्थित शेतकरी व पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली.

खासदार डॉ. कल्याण काळे यांना निवेदन देताना शिवसेना (उबाठा) जिल्हाध्यक्ष मनिष श्रीवास्तव, काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, बदर भाई चाऊस, मुरलीधर शेजूळ, प्रभाकर मामा पवार, कृष्णा पा. पडूळ (तालुकाध्यक्ष, काँग्रेस कमिटी, जालना), सुभाष कोळकर, अशोकराव उबाळे, अब्दुल रऊफ, शांतीलाल बनसोडे, दिनेश सुराणा, सय्यद करीम, सोपान तिरुखे, ज्ञानेश्वर डुकरे, ज्ञानदेव इंगोले, गणेशराव खरात, नारायण वाढेकर, गजानन उगले, रघुवीर गुढे, योगेश कदम, शेषराव जाधव, शेख वासिम, शेख जमीर, रज्जाक, योगीताताई धांडगे, संजय बागल, वसीम खान, एस. आर. काळे, बाबा चांगुलपाय, राहुल जयस्वाल, शेख अमीन, दिनेश कावळे, राजू शेळके, कलीम खान, दिग्विजय धांडगे, आरेफ खान यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मृत्यूच्या उंबरठ्यावरुन...

आला. तिचे म्हणणे ऐकून घेत पोलिसांनी तिला जीवनाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला.

या संपूर्ण प्रसंगात पोलिसांनी केवळ कायदा-सुव्यवस्थेची भूमिका न बजावता समुपदेशक आणि आधार देणाऱ्या व्यक्तीची भूमिका पार पाडली. महिलेच्या मनातील नकारात्मक विचार समजून घेत तिच्याशी सातत्याने संवाद साधण्यात आला. तिच्या अडचणी ऐकून घेण्यात आल्या आणि कोणतीही समस्या जीवनापेक्षा मोठी नसल्याचा सकारात्मक संदेश देण्यात आला. पोलिसांच्या संयमी आणि संवेदनशील संवादाला महिलेने सकारात्मक प्रतिसाद दिला. अखेर तिने आत्महत्येचा विचार सोडून दिला. त्यानंतर पोलिसांनी तिला सुरक्षितपणे ताब्यात घेतले आणि तिच्या नातेवाईकांशी संपर्क साधला. आवश्यक ती काळजी घेत महिलेला सुखरूपपणे नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. एखाद्या व्यक्तीला आत्महत्येपासून परावृत्त करणे ही केवळ पोलिसांची तातडीची कारवाई नसून अत्यंत संयम, मानसिक समज आणि परिस्थितीचे अचूक आकलन आवश्यक असलेली जबाबदारी आहे. चंदनझिरा पोलिसांनी प्रसंगावधान राखत ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली.

घटनेनंतर पोलिसांच्या या संवेदनशील भूमिकेचे कौतुक होत आहे. पोलिसांकडे सामान्यतः कायदा-सुव्यवस्था, गुन्हे तपास आणि कारवाई करणारी यंत्रणा म्हणून पाहिले जाते; मात्र या घटनेत पोलिसांनी 'खाकीतील माणुसकी' दाखवून दिली. कौटुंबिक वाद, भावनिक धक्का, आर्थिक अडचणी, नैराश्य किंवा अन्य कारणांमुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या खचू शकते. अशा वेळी घेतलेला टोकाचा निर्णय कायमस्वरूपी परिणाम घडवून आणू शकतो. मात्र योग्य वेळी कुटुंबीय, मित्र, समाज किंवा प्रशासनातील व्यक्तीकडून मिळालेला आधार परिस्थिती बदलू शकतो. मोती तलावातील या घटनेतही क्षणिक भावनिक अवस्थेवर संयमी संवादाने मात करता येते, हे अधोरेखित झाले आहे. पोलीस यंत्रणेचे काम केवळ गुन्हेगारांना पकडणे किंवा कायद्याची अंमलबजावणी करणे एवढ्यापुरते मर्यादित नाही. संकटात सापडलेल्या नागरिकाला सुरक्षितता आणि मानसिक आधार देणे हीदेखील पोलिसांची महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे. चंदनझिरा पोलिसांनी या घटनेत दाखविलेली तत्परता, संयम, संवादकौशल्य आणि मानवी दृष्टिकोन हे संवेदनशील पोलिसिंगचे उदाहरण ठरले आहे.

ही कामगिरी जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पवार, मारीयो स्कॉट, सय्यद हुसेन, सहायक फौजदार मनसुब वेताळ, पोलीस हवालदार शिवाजी जमधडे, महिला पोलीस हवालदार रेश्मा गुरुम आणि जया जैस्वाल यांच्या पथकाने ही कारवाई केली. मोती तलावातील ही घटना समाजासाठीही महत्त्वाचा संदेश देऊन जाते. एखादी व्यक्ती मानसिकदृष्ट्या खचलेली दिसत असेल तर तिच्याकडे दुर्लक्ष न करता तिच्याशी संवाद साधणे, तिचे म्हणणे ऐकून घेणे आणि आवश्यक असल्यास कुटुंबीय अथवा तज्ज्ञांची मदत घेणे गरजेचे आहे. क्षणिक राग, दुःख किंवा नैराश्यात घेतलेला निर्णय संपूर्ण आयुष्य बदलू शकतो; परंतु योग्य वेळी मिळालेला आधार, विश्वास आणि संवाद एखाद्याचे आयुष्य वाचवू शकतो.

चंदनझिरा पोलिसांनी एका महिलेचा जीव वाचवून केवळ एक कारवाई पूर्ण केलेली नाही, तर 'खाकी वर्दीच्या मागे संवेदनशील माणूसही असतो', हा विश्वास नागरिकांच्या मनात अधिक दृढ केला आहे.

### मुख्यमंत्री सहाय्यता...

नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यातून राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत उपलब्ध होणार आहे. पैशांअभावी कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, या उद्देशातून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. गरजू रुग्णांनी अधिक माहितीसाठी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

### जालना पोलीस...

वृक्षारोपणाच्या अनेक मोहिमा केवळ रोपे लावण्यापुरत्या मर्यादित राहतात. मात्र रोपांना नियमित पाणी देणे, त्यांचे संरक्षण करणे, जनावरांपासून बचाव करणे आणि त्यांची वाढ होईपर्यंत आवश्यक काळजी घेणे या बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. 'ग्रीन फाउंडेशन'कडून याच बाबीवर विशेष भर दिला जात आहे. वृक्षारोपण कार्यक्रमादरम्यान केवळ रोपे लावून थांबायचे नाही, तर त्यांची नियमित देखभाल करून ती मोठी करण्याचा संकल्प करण्यात आला. पुढील तीन वर्षे लावलेल्या झाडांची देखभाल करण्याची जबाबदारी घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय यावेळी व्यक्त करण्यात आला. या उपक्रमामुळे पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरातील हरित क्षेत्र वाढण्यास मदत होणार असून भविष्यात परिसर अधिक हिरवागार आणि पर्यावरणपूरक होण्यास हातभार लागणार आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची किंवा एखाद्या विभागाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक घटकाने त्यामध्ये योगदान देणे आवश्यक आहे. शासकीय यंत्रणा, पोलीस प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, उद्योग आणि नागरिक यांनी एकत्रितपणे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची चळवळ उभी केल्यास त्याचे व्यापक परिणाम दिसून येऊ शकतात. विशेषतः वृक्षारोपणासोबत वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. लावलेले रोप जगवणे हेच खऱ्या अर्थाने पर्यावरण संवर्धनाचे यश असल्याचे उपस्थितांनी सांगितले. वृक्षारोपण कार्यक्रमास पोलीस उपअधीक्षक बाळासाहेब पवार (आर्थिक गुन्हे शाखा), स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे, पोलीस कल्याण विभागाचे पोलीस निरीक्षक उदावत, राखीव पोलीस निरीक्षक भाऊसाहेब वाघ, कार्यालय अधीक्षक एन. आर. राठोड यांच्यासह पोलीस विभागातील विविध अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वृक्षारोपणात सहभागी होत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आल्याने परिसराच्या सौंदर्यातही भर पडणार आहे. आजच्या काळात केवळ वृक्षारोपणाच्या संख्येकडे न पाहता लावलेल्या झाडांचा जगण्याचा दर वाढविणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीने किमान एक झाड लावून त्याची नियमित देखभाल करण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांना मोठी चालना मिळू शकते. जालना पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरातील या वृक्षारोपण उपक्रमातून 'झाड लावा आणि झाड जगवा' हा संदेश देण्यात आला. पोलीस प्रशासन आणि सामाजिक संस्थेच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात आलेला हा उपक्रम पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल ठरला आहे.

### डफरीन हॉस्पिटल मधील...

प्रतिबंधात्मक उपाय म्हणून महिला व बाल विकास विभागाच्या वतीने बाल न्याय कायद्यांतर्गत कार्यरत बालकांची काळजी घेणाऱ्या राज्यातील सर्व निरीक्षणगृह, बालगृह यासारख्या निवासी संस्थांचे अग्निसुरक्षा परीक्षण आणि संरचनात्मक परीक्षण करण्याच्या लेखी सूचना महिला व बाल विकास आयुक्तांना बाल हक्क आयोगाच्या वतीने देण्यात आलेल्या आहेत, अशी माहितीही डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिली.

### श्रीक्षेत्र रामेश्वरीचा...

आहे. तसेच मौजपुरी व पंचक्रोशीतील नागरिकांसाठीही या पायाभूत सुविधांचा लाभ होणार आहे.

आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या विविध विकासकामांचे उद्घाटन दुसऱ्या श्रावण सोमवारी करण्यात आले. यामध्ये मंदिर परिसरातील आरओ फिल्टर, भाविक व नागरिकांच्या सोयीसाठी सौर पथदिवे, दोन सभागृहांचे बांधकाम, शाळेच्या नवीन खोलीचे बांधकाम तसेच शाळेच्या खोलीच्या दुरुस्तीच्या कामांचा समावेश आहे.

या सर्व कामांसाठी एकूण ८१ लाख रुपये खर्च होणार असून, विकासकामांमुळे मंदिर परिसरासह स्थानिक शैक्षणिक आणि नागरी सुविधांमध्येही सुधारणा होणार आहे.

विशेषतः मंदिर परिसरात आरओ फिल्टरची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे भाविकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळण्यास मदत होणार आहे. सौर पथदिव्यांमुळे रात्रीच्या वेळी मंदिर परिसरातील प्रकाशव्यवस्था अधिक सक्षम होणार असून, भाविकांची सुरक्षिततााही वाढणार आहे.

**'शेगावच्या धर्तीवर रामेश्वरीचा कायापालट'**

यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी श्रीक्षेत्र रामेश्वरी महादेव मंदिराचा विकास मोठ्या प्रमाणावर करण्याचा निर्धार व्यक्त केला. ''श्रीक्षेत्र शेगावच्या धर्तीवर रामेश्वरी मंदिराचा कायापालट करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी राज्याचे मंत्री शंभूराजे देसाई यांच्या माध्यमातून १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल,'' असे आमदार खोतकर यांनी सांगितले. रामेश्वरी मंदिराचा केवळ धार्मिक स्थळ म्हणून विकास न करता परिसरातील भाविकांसाठी आवश्यक सुविधा, रस्ते, प्रकाशव्यवस्था, पाणीपुरवठा आणि इतर पायाभूत सुविधा विकसित करण्याचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मंदिर परिसरात वर्षभर भाविकांची वर्दळ असते. श्रावण महिन्यात विशेषतः प्रत्येक सोमवारी भाविकांची संख्या वाढते. त्यामुळे मंदिर परिसरात स्वच्छता, पिण्याचे पाणी, प्रकाशव्यवस्था, वाहनतळ, रस्ते आणि भाविकांच्या विश्रांतीसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

आगामी काळात मंदिराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाल्यास रामेश्वरी परिसराचा धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीनेही विकास होण्याची शक्यता आहे. यामुळे मौजपुरी आणि पंचक्रोशीतील स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते.

**निरखेडा-रामेश्वरी रस्त्यालाही मिळणार चालना**

रामेश्वरी मंदिराकडे जाणारा रस्ता हा भाविकांच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने निरखेडा ते रामेश्वरी मंदिर रस्ता सुधारण्याच्या कामाला प्रस्तावित विकासकामांमध्ये स्थान देण्यात आले आहे. मंदिर परिसरातील पूल आणि संरक्षक भिंतीसह रस्त्याच्या कामामुळे भाविकांची ये-जा अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था खराब होणे, वाहतुकीची अडचण निर्माण होणे तसेच मंदिर परिसरात गर्दीच्या वेळी होणारी गैरसोय लक्षात घेऊन या पायाभूत कामांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

कार्यक्रमास पंडितराव भुतेकर, पांडुरंग डोंगरे, संजय शेजुळ, गणेश मोहिते, नगरसेवक अमोल ठाकूर, वसंत राजे जाधव, सरपंच बद्री भसांडे, उपसरपंच आबा डोंगरे, कमलाकर कळकुंबे, भगवान अंभोरे, विष्णू ढोकळे, बाबा गोरे, माऊली गोरे, माऊली लकडे, अजय कदम, बाळू पाचरणे, बाबा अंबटकर, गोपाल डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच आप्पा उगले, कृष्णा डोंगरे, चंद्रकांत साबळे, अरुण डोंगरे, विष्णू गायकवाड, कृष्णा सुरोशे, रमेश शिंदे, तुकाराम डोंगरे, विनायक घुले, नारायण डोंगरे, संजय चव्हाण, राजू महाडीक, बापू डोंगरे, बंडू काळे, राम बळप, सर्जेराव डोंगरे, प्रभाकर गायकवाड, राम जाधव, विष्णू गायकवाड, अशोक ढेंगळे, हरी लकडे, भागवत मोरे, रंगा ढोकळे, आबासाहेब डोंगरे, बाळू डोंगरे, दीपक डोंगरे, रमेश शिंदे, आप्पासाहेब डोंगरे, राम जाधव, सुनील मोरे, बालाजी बळप, उत्तम कोरडे, रघुनाथ ढोकळे, विष्णू ढोकळे, भागवत बळप, विष्णू डोंगरे, सुनील कांबळे, विष्णूपंत गायकवाड, ज्ञानेश्वर वाहेकर आणि सिद्धेश्वर खरात यांच्यासह रामेश्वर संस्थानचे विश्वस्त व मौजपुरी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामेश्वरी महादेव मंदिराच्या विकासासाठी प्रस्तावित दोन कोटींचा निधी आणि भविष्यात १०० कोटी रुपयांच्या निधीचे आश्वासन प्रत्यक्षात आल्यास मंदिर परिसराचा चेहरामोहरा बदलण्याची शक्यता आहे. मंदिर परिसरातील पायाभूत सुविधा सक्षम झाल्यास भाविकांची संख्या वाढण्याबरोबरच परिसरातील धार्मिक पर्यटनालाही चालना मिळू शकते.

आता घोषित केलेल्या निधीतून प्रस्तावित कामांना किती लवकर सुरुवात होते आणि भविष्यातील मोठ्या विकास आराखड्याला प्रत्यक्ष किती गती मिळते, याकडे मौजपुरीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि भाविकांचे लक्ष लागले आहे.

### पदवीधर शिक्षक...

आदेश मिळवणे ही लढाईची एक बाजू आहे, तर त्या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत पाठपुरावा करणे ही आमची जबाबदारी आहे. शिक्षकांच्या न्याय्य हक्कासाठी संघर्ष सुरूच राहील. या वेळी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष जावेद खान, कोषाध्यक्ष तालेब कुरेशी, सहसचिव रियाज खान, मोहम्मद अवेज इम्रान तसेच याचिकाकर्ते तन्वीर जहाँ बाजी, आंसा बेनजीर बाजी, फारुखी हुमेरा बाजी, तबस्सुम बाजी, नुसरत बाजी, रुबीना बाजी यांच्यासह इतर शिक्षक उपस्थित होते. संघटनेच्या या पाठपुराव्यामुळे संबंधित शिक्षकांमध्ये आशावाद निर्माण झाला असून, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे पदवीधर शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न लवकर मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### काँग्रेसच्या जालना...

कृष्णा पडूळ, कल्याण तारडे, राजेंद्र गोरे लक्ष्मणराव मसलेकर, नारायण वाडेकर,शे.शमशुद्दीन, रहीम तांबोळी, रघुवीर गुडे, आर डी पवार,शहराध्यक्ष जाकेर डावरगावकर, सय्यद गणी,गौरी कुलकर्णी, दिग्विजय धांडगे, विशाल
कदम, अंबिका धांडे, इत्यादींची मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी उपस्थिती होती.

### मत्स्योदरी अभियांत्रिकी...

संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील राहील, असे त्यांनी सांगितले. या यशामुळे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून उज्ज्वल करिअर घडविण्यासाठी निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.

### आई-वडिलांचा...

नाही, आणि जोपर्यंत आपल्याला परमार्थाची अवस्था निर्माण होणार नाही तोपर्यंत आपल्या जीवनाचे सार्थक होत नाही. दिवे दोन आहेत परंतु प्रकाश एकच आहे ओठ दोन आहेत परंतु शब्द एकच आहे, फुले दोन आहेत पण सुगंध एकच आहे डोळे दोन आहेत परंतु नजर एकच आहे ती स्त्री आणि पुरुषाने केलेला परमार्थ हा एकच आहे, असे महाराजांनी बोलतांना सांगितले या वेळी सर्वश्री हभप प्रा.नारायणराव बोराडे, प्रा.शिवकुमार सोळंके, पत्रकार गुलाबराव पाटील, प्रा,उद्धवराव बागल, मधुकरराव गरड, भवर महाराज, पवार महाराज यांची उपस्थिती होती.....

# ‘हमको इंडियन बोलो!’ ईशान्य भारताला परके समजण्याची मानसिकता बदलली पाहिजे

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती, परंपरा, भौगोलिक परिस्थिती आणि चेहऱ्यापासून रंगरूपापर्यंत असंख्य विविधता भारताच्या ओळखीचा भाग आहे. मात्र, याच विविधतेकडे आपण एकात्मतेच्या नजरेने पाहण्याऐवजी कधी कधी पूर्वग्रहाच्या चष्म्यातून पाहतो, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. ईशान्य भारतातील नागरिकांना त्यांच्या चेहऱ्याच्या ठेवणीवरून ‘चिनी’ किंवा ‘परदेशी’ संबोधण्याची प्रवृत्ती हा केवळ विनोदाचा विषय नसून भारतीयत्वाच्या व्यापक संकल्पनेलाच धक्का देणारा गंभीर सामाजिक प्रश्न आहे.

अलीकडे सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका लहान मुलीच्या व्हिडिओने या प्रश्नाकडे संपूर्ण देशाचे लक्ष वेधले. ‘आम्हाला इंडियन बोला’ अशी तिची भावनिक विनंती अनेकांच्या मनाला चटका लावून गेली. आम्ही भारतीय आहोत, आम्ही इटानगरमध्ये राहतो, तरी आमच्या दिसण्यावरून आम्हाला चिनी का म्हटले जाते, असा तिचा सवाल आहे. एखाद्या निरागस मुलीला आपल्या देशातीलच नागरिकांनी आपण भारतीय आहोत हे सांगण्याची वेळ यावी, हीच आपल्या सामाजिक मानसिकतेसाठी आत्मपरीक्षणाची बाब आहे.

ईशान्य भारतातील अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा आणि सिक्कीम या राज्यांचा भारताच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक रचनेत अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. या प्रदेशाने देशाच्या संरक्षणापासून क्रीडा, शिक्षण, कला, संगीत आणि प्रशासनापर्यंत अनेक क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले आहे. सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन अनेकदा कठीण परिस्थितीतून जात असते. देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यात तेथील नागरिकांची भूमिका महत्त्वाची आहे. अशा नागरिकांना त्यांच्या रूपावरून परके ठरवणे म्हणजे त्यांच्या योगदानाचा आणि भारतीयत्वाचा अपमानच होय.

आपल्या देशातील एखाद्या व्यक्तीचे डोळे, चेहऱ्याची ठेवण किंवा त्वचेचा रंग आपल्या परिचयाच्या चौकटीपेक्षा वेगळा आहे म्हणून त्याला परदेशी समजणे ही अज्ञानातून निर्माण झालेली मानसिकता आहे. भारतीयत्वाला विशिष्ट चेहरा नाही. भारतीय असण्यासाठी एखाद्या ठरावीक पद्धतीचे दिसणे आवश्यक नाही. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत प्रत्येक नागरिक भारताचा समान नागरिक आहे.

विशेषतः महानगरांमध्ये शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायासाठी ईशान्येकडील राज्यांमधून मोठ्या संख्येने तरुण-तरुणी येतात. त्यांना त्यांच्या नावावरून, भाषेवरून किंवा चेहऱ्याच्या ठेवणीवरून हिणवले जाणे, त्यांची खिल्ली उडवली जाणे किंवा ‘चिनी’ म्हणून संबोधले जाणे ही अत्यंत वेदनादायक बाब आहे. एखाद्याला विनोद म्हणून केलेली टिप्पणी दुसऱ्याच्या मनावर किती खोल परिणाम करू शकते, याचा विचार आपण केला पाहिजे. सतत परकेपणाची जाणीव करून दिली गेल्यास त्या नागरिकांच्या मनात आपल्या देशाबद्दलच दुरावा निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणूनच अशा घटना किरकोळ समजून दुर्लक्षित करता कामा नये.

ईशान्य भारत हा भारताचा केवळ सीमावर्ती प्रदेश नाही; तो भारताच्या आत्म्याचा अविभाज्य भाग आहे. या प्रदेशातील लोकांची संस्कृती, लोककला, संगीत, नृत्य, हस्तकला, खाद्यपरंपरा आणि जीवनशैली भारताच्या सांस्कृतिक वैविध्याला अधिक समृद्ध करतात. त्यांच्या वेगळेपणाचा आदर करणे म्हणजे त्यांना वेगळे मानणे नव्हे; उलट त्यांच्या वैशिष्ट्यांसह त्यांना भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहात समान स्थान देणे होय.

गेल्या काही वर्षांत ईशान्य भारताच्या विकासाकडे केंद्र आणि राज्य सरकारांकडून अधिक लक्ष दिले जात आहे. रस्ते, रेल्वे, विमानसेवा, शिक्षण, डिजिटल कनेक्टिव्हिटी, पर्यटन आणि रोजगाराच्या संधी वाढवण्याचे प्रयत्न होत आहेत. ईशान्येकडील अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. क्रीडा क्षेत्रात या राज्यांतील तरुणांनी मिळवलेल्या यशामुळे संपूर्ण देशाला अभिमान वाटतो. कला, संगीत आणि सांस्कृतिक क्षेत्रातही ईशान्य भारताची स्वतंत्र ओळख आहे. ही ओळख भारताच्या व्यापक ओळखीला समृद्ध करणारी आहे.

मात्र केवळ विकासकामे करून प्रश्न सुटणार नाही. मानसिकतेत बदल होणे तितकेच आवश्यक आहे. ‘एक भारत, श्रेष्ठ भारत’ ही संकल्पना केवळ घोषवाक्य न राहता ती नागरिकांच्या वर्तनातून दिसली पाहिजे. शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये भारताच्या ईशान्येकडील राज्यांविषयी अधिक माहिती दिली पाहिजे. तेथील इतिहास, संस्कृती, समाजजीवन आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदान विद्यार्थ्यांना समजावून सांगितले पाहिजे. देशातील विविध प्रदेशांतील विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवली पाहिजे. माध्यमे आणि सोशल मीडिया यांचीही या संदर्भात मोठी जबाबदारी आहे. एखाद्या व्यक्तीच्या दिसण्याची खिल्ली उडवणारे किंवा एखाद्या समाजसमूहाला परके ठरवणारे विनोद ‘मनोरंजन’ म्हणून प्रसारित होऊ नयेत. सोशल मीडियावर एखाद्या मुलीने आपल्या मनातील वेदना व्यक्त केल्यानंतर तिचे कौतुक करण्यापेक्षा त्या वेदनेमागचे कारण समाजाने समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रध्वजाला सलाम करणे किंवा राष्ट्रगीत म्हणणे नव्हे. देशभक्ती म्हणजे आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाचा सन्मान करणे. आपल्या शेजाऱ्याची भाषा वेगळी असली, त्याचा धर्म वेगळा असला, त्याची संस्कृती वेगळी असली किंवा त्याचा चेहरा आपल्या ओळखीपेक्षा वेगळा असला तरी तो आपलाच भारतीय नागरिक आहे, ही भावना मनात रुजवणे म्हणजे खरी देशभक्ती. ‘हमको इंडियन बोलो’ या एका लहान मुलीच्या शब्दांमध्ये त्यामुळे केवळ तिची व्यक्तिगत तक्रार नाही; तर संपूर्ण समाजाला विचार करायला लावणारा मोठा संदेश आहे. तिला किंवा ईशान्य भारतातील कोणत्याही नागरिकाला आपले भारतीयत्व सिद्ध करण्याची वेळ पुन्हा येऊ नये. त्यांच्या चेहऱ्यात आपल्याला परकेपणा नव्हे, तर भारताची विविधता दिसली पाहिजे. भारताची खरी ताकद त्याच्या एकसारखेपणात नाही, तर विविधतेत एकता राखण्याच्या क्षमतेत आहे. त्यामुळे आता प्रश्न ‘तू कुठला दिसतोस?’ हा नसून ‘तू भारतीय आहेस, एवढेच पुरेसे नाही का?’ असा असायला हवा.

ईशान्य भारताला मुख्य प्रवाहात आणण्याची गरज नाही; कारण तो आधीपासूनच भारताच्या मुख्य प्रवाहाचा अविभाज्य भाग आहे. गरज आहे ती फक्त आपल्या मानसिकतेतील भिंती पाडण्याची. ‘हमको इंडियन बोलो’ ही एका मुलीची आर्त हाक भविष्यात कोणत्याही भारतीयाला द्यावी लागू नये, हीच खरी राष्ट्रीय एकात्मतेची कसोटी आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# आर्चना जैन, लुब्धा पोरवाल आणि अलीफिया बागस्रावाला यांचा मानसिक व भावनिक आरोग्यासाठी अभिनव उपक्रम



डॉ. मंजू लोढा यांच्या हस्ते सुहैल खंडवानी व दिलशाद एस. खान यांचा सन्मान

आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेक जण आपल्या चेहऱ्यावरील हास्यामागे मानसिक ताण, भावनिक संघर्ष आणि एकटेपणाच्या भावना दडवून ठेवतात. अशा परिस्थितीत ‘‘तुम्ही एकटे नाही आहात’’ हा आश्वासक संदेश देत या नव्या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. आर्चना जैन, लुब्धा पोरवाल आणि अलीफिया बागस्रावाला यांनी स्थापन केलेला हा समुदाय मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी समर्पित असून , आणि यांच्या सहकार्याने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. १९ ऑगस्ट रोजी शारदा मंदिर हायस्कूल येथे चा भव्य शुभारंभ सोहळा पार पडला. करुणा, मानवता आणि परस्पर जोडणीच्या भावनेला समर्पित असलेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, प्रेरणादायी पॅनेलिस्ट, समर्थक आणि शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. मंजू लोढा उपस्थित होत्या. तसेच हाजी अली दर्गा व माहिम दर्ग्याचे विश्वस्त सुहैल खंडवानी आणि दैनिक मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खान यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी डॉ. मंजू लोढा यांच्या हस्ते सुहैल खंडवानी आणि दिलशाद एस. खान यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात मानसिक आरोग्य, भावनिक आधार, समाजातील परस्पर संवाद आणि एकमेकांना साथ देण्याचे महत्त्व यावर सखोल चर्चा झाली. भावनिक क्षण, प्रेरणादायी अनुभव आणि सकारात्मक संवादांनी उपस्थितांना नवी ऊर्जा दिली. या यशस्वी आयोजनामुळे च्या पुढील वाटचालीस मजबूत पाया मिळाला आहे. संस्थापकांनी या उपक्रमाला पाठिंबा देणाऱ्या सर्व मान्यवर, स्वयंसेवक आणि सहभागींचे मनःपूर्वक आभार मानले. लवकरच चे स्वतंत्र मोबाईल ॲपही सुरू करण्यात येणार असून त्याद्वारे अधिकाधिक लोकांपर्यंत मानसिक आणि भावनिक आधाराचे हे व्यासपीठ पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. * चे ध्येय, दृष्टी आणि उद्दिष्टे* समाजातील प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय, भीतीशिवाय आणि संकोचाशिवाय आपले विचार व भावना व्यक्त करता याव्यात, यासाठी सुरक्षित आणि समावेशक व्यासपीठ निर्माण करणे हे संस्थेचे ध्येय आहे. मानसिक आणि भावनिक आरोग्याला प्राधान्य देणारा, एकमेकांना आधार देणारा आणि कोणीही स्वतःला एकटे समजू नये असा सक्षम समुदाय निर्माण करणे ही संस्थेची दृष्टी आहे. सपोर्ट सर्कल, जनजागृती मोहिमा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, वेलनेस उपक्रम आणि सामुदायिक सहभागाच्या माध्यमातून भावनिक सक्षमीकरण करणे, मानसिक आरोग्याविषयीचा कलंक दूर करणे आणि लोकांना स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी प्रोत्साहित करणे हे चे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# वॉक फॉर वॉटर’मधून महाराष्ट्रात जलसंधारणाची लोकचळवळ अधिक बळकट – मंत्री संजय राठोड

**मुंबई - प्रतिनिधी**

माती वाचवणे, पाणी जपणे आणि जलसंधारणाच्या कार्याला व्यापक लोकसहभागाची जोड देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या ‘महा वॉकेथॉन वॉक फॉर वॉटर’ला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यातील ३६ जिल्ह्यांत एकाचवेळी झालेल्या या उपक्रमात तीन लाखांहून अधिक नागरिक सहभागी झाले. या सहभागातून जलसंधारणाचा संदेश महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला, असे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

जलसंधारण हा केवळ शासनाचा विषय नसून प्रत्येक नागरिकाच्या भवितव्याशी निगडित विषय आहे. त्यामुळे जलसंधारणाच्या कामांना लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने ‘वॉक फॉर वॉटर’चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा महाराष्ट्रातील जनतेची जलसंधारणाबाबतची जागरूकता आणि सहभागाची भावना अधोरेखित करणारा आहे, असे मंत्री राठोड यांनी सांगितले.

प्रत्येक सहभागीने तीन किलोमीटर अंतर चालत जलसंधारणाचा संदेश दिला. तीन लाखांहून अधिक नागरिकांच्या सहभागातून हा सामूहिक प्रवास पूर्ण झाला. ही केवळ आकडेवारी नसून माती आणि पाणी संवर्धनासाठी महाराष्ट्राच्या जनतेने व्यक्त केलेली सामूहिक बांधिलकी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

मुंबईतील वरळी येथे या उपक्रमाला सुरुवात झाली. त्याचवेळी राज्यातील ३६ जिल्ह्यांत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थी, युवक, महिला, शेतकरी, कर्मचारी, महाविद्यालयीन तरुणाई तसेच विविध सामाजिक घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विशेषतः युवकांचा सहभाग हा या उपक्रमाची महत्त्वाची जमेची बाजू ठरली.

**जलसंधारणाच्या योजनांना लोकसहभागाची जोड**

राज्यात ‘जलयुक्त शिवार अभियान २.०’, ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’, ‘अमृत सरोवर’, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आदी विविध माध्यमांतून जलसंधारणाची कामे राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या उद्देशांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासोबतच जलसंधारणाच्या कामांमध्ये लोकसहभाग वाढविण्यासाठी ‘वॉक फॉर वॉटर’ प्रभावी माध्यम ठरले आहे. पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे, भूजल पुनर्भरण वाढविणे, जलस्रोतांचे संवर्धन करणे आणि मातीची धूप रोखणे यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. शासनाच्या प्रयत्नांना लोकसहभागाची जोड मिळाल्यास जलसंधारणाची कामे अधिक परिणामकारक आणि शाश्वत होतील, असे मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

जलसंधारण अभियानाला जनसहभागाचे बळ

१५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत राज्यात ‘जलसंधारण अभियान’ राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून गावागावांत जलसंधारण, पाणलोट विकास, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, गाळ काढणे, भूजल पुनर्भरण आणि मृदसंवर्धनाच्या कामांना गती देण्यात येणार आहे. तसेच अभियानादरम्यान काही निवडक गावांमध्ये जलशोषक खड्डे तयार करण्याचे उद्दिष्ट देण्यात येणार आहे. ‘महा वॉकेथॉन वॉक फॉर वॉटर’ला मिळालेला प्रतिसाद या अभियानाला निश्चितच नवे बळ देणारा आहे. एका दिवसाच्या उपक्रमापुरता मर्यादित न राहता जलसंधारणाचा संदेश प्रत्येक गावापर्यंत आणि प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्री संजय राठोड यांनी केले.

माती वाचली तर शेती वाचेल, पाणी जपले तर भविष्यातील पिढ्यांचे जीवन सुरक्षित होईल. जलसंधारणाची जबाबदारी शासनासोबतच समाजाचीही आहे. ‘वॉक फॉर वॉटर’मधून महाराष्ट्राने दिलेला संदेश आता प्रत्यक्ष कृतीत उतरवून जलसंधारणाची लोकचळवळ अधिक व्यापक करूया, असे मंत्री राठोड यांनी सांगितले.

# कुंभमेळ्याला विरोध नाही; जनतेच्या पैशाचा हिशेब हवा

कुंभमेळा ही भारतीय समाजजीवनातील प्रदीर्घ सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा आहे. लाखो भाविक श्रद्धेने या सोहळ्यात सहभागी होतात. त्यामुळे कुंभमेळ्याच्या निमित्ताने मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि वाहतूक व्यवस्था सक्षम करणे, तसेच शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे याला आक्षेप असण्याचे कारण नाही. प्रश्न कुंभमेळ्याचा नाही; प्रश्न सार्वजनिक पैशाच्या वापराचा आणि त्यातील पारदर्शकतेचा आहे.*

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचा आराखडा मांडला आहे. एप्रिलमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या कामांचा रोडमॅप जाहीर केला होता. त्यानंतर प्रशासकीय माहितीत विकास आराखड्याचा आकडा ३४,७३२ कोटी रुपये असल्याचे समोर आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणातील सार्वजनिक निधीचा वापर होणार असेल, तर त्याच्या नियोजनाची, खर्चाची आणि परिणामांची माहिती नागरिकांना मिळणे स्वाभाविकपणे अपेक्षित आहे.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही या संदर्भात सविस्तर डीपीआर म्हणजेच प्रकल्प अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. कोणती कामे केली जाणार, त्यांचा खर्च किती आहे, कोणत्या यंत्रणेमार्फत ती केली जाणार, निविदा प्रक्रिया कशी असेल आणि कंत्राटदारांची निवड कोणत्या पद्धतीने केली जाणार, याची माहिती सार्वजनिक व्हावी, अशी त्यांची भूमिका आहे. ही मागणी कुंभमेळ्याला विरोध करणारी नसून सार्वजनिक खर्चाच्या पारदर्शकतेशी संबंधित आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.*

सरकारच्या म्हणण्यानुसार या विकास आराखड्यातील सुमारे ८५ टक्के खर्च कायमस्वरूपी पायाभूत सुविधांवर केला जाणार आहे. जर हा दावा प्रत्यक्षात उतरला आणि कुंभमेळा संपल्यानंतरही या सुविधा नाशिक शहर आणि परिसरातील नागरिकांना दीर्घकाळ उपयोगी पडल्या, तर हा खर्च केवळ धार्मिक आयोजनावरील खर्च न राहता दीर्घकालीन नागरी विकासातील गुंतवणूक ठरू शकतो.*

याच कारणामुळे या आराखड्याची सविस्तर माहिती सार्वजनिक करण्याची गरज अधिक वाढते. कोणत्या रस्त्यांसाठी किती निधी खर्च होणार, पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थेसाठी किती तरतूद आहे, वाहतूक व्यवस्थेसाठी कोणती कामे होणार, रिंग रोड किंवा अन्य महत्त्वाच्या मार्गांवर किती खर्च होणार, नदी आणि घाटांच्या स्वच्छतेसाठी किती निधी राखून ठेवला आहे, तसेच कुंभमेळ्यासाठी उभारल्या जाणाऱ्या तात्पुरत्या सुविधांवर किती खर्च होणार, याची स्पष्ट माहिती नागरिकांसमोर असणे आवश्यक आहे.*

यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कायमस्वरूपी आणि तात्पुरत्या खर्चातील फरक. मोठ्या धार्मिक किंवा सांस्कृतिक आयोजनासाठी काही तात्पुरत्या सुविधा उभाराव्या लागतात. त्या आयोजनानंतर काढून टाकल्या जातात. त्यांचा उपयोग मुख्यतः त्या कालावधीपुरता असतो. त्याउलट रस्ते, पूल, पाणीपुरवठा योजना, सांडपाणी व्यवस्था, आरोग्य सुविधा आणि वाहतूक व्यवस्था यांसारख्या पायाभूत सुविधा दीर्घकाळ नागरिकांच्या उपयोगात राहू शकतात.*

त्यामुळे ३४,७३२ कोटी रुपयांच्या आराखड्याचे मूल्यमापन केवळ एकूण रकमेवरून न करता त्या पैशातून निर्माण होणाऱ्या कायमस्वरूपी सार्वजनिक मालमत्तेवरून झाले पाहिजे. कुंभमेळा संपल्यानंतर नाशिककरांच्या हातात नेमक्या कोणत्या सुविधा राहणार आहेत, हा या संपूर्ण खर्चाच्या मूल्यांकनाचा महत्त्वाचा निकष असला पाहिजे.*

उदाहरणार्थ, कुंभमेळ्याच्या निमित्ताने एखादा रस्ता बांधला गेला आणि तो पुढील अनेक वर्षे नागरिकांच्या वाहतुकीसाठी उपयोगी पडला, तर त्याचा लाभ केवळ भाविकांपुरता मर्यादित राहणार नाही. एखादी पाणीपुरवठा योजना उभारली गेली आणि त्यातून शहरातील नागरिकांना दीर्घकाळ पाणी मिळाले, तर ती सार्वजनिक गुंतवणूक ठरेल. सांडपाणी व्यवस्थेत सुधारणा होऊन गोदावरीचे प्रदूषण कमी झाले, तर त्याचा लाभ धार्मिक आयोजनाच्या पलीकडे जाऊन पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्याला होईल.*

मात्र अशा कायमस्वरूपी लाभांच्या तुलनेत तात्पुरत्या सुविधांवर होणारा खर्च किती आहे, हेही स्पष्ट झाले पाहिजे. सार्वजनिक निधीचा प्रत्येक खर्च त्याच्या उद्देशाशी आणि परिणामाशी जोडलेला असणे आवश्यक आहे.*

यामागे आणखी एक व्यापक प्रश्न आहे. सार्वजनिक निधी मर्यादित असतो. सरकारसमोर शिक्षण, आरोग्य, शेती, पाणी, रोजगार, ग्रामीण पायाभूत सुविधा आणि नागरी विकास यांसारख्या अनेक क्षेत्रांच्या गरजा असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी एखाद्या प्रकल्पासाठी वापरताना त्यातून निर्माण होणारा सार्वजनिक लाभ किती आहे, याचा विचार होणे अपरिहार्य आहे.*

याचा अर्थ धार्मिक किंवा सांस्कृतिक आयोजनांवर सरकारने खर्च करू नये, असा नाही. भारतासारख्या देशात धार्मिक पर्यटन, सांस्कृतिक वारसा आणि मोठ्या प्रमाणातील यात्रांचा स्थानिक अर्थव्यवस्थेवरही परिणाम होतो. मोठ्या संख्येने भाविक आणि पर्यटक आल्यामुळे स्थानिक व्यापार, वाहतूक, हॉटेल व्यवसाय, छोटे व्यावसायिक आणि सेवा क्षेत्राला आर्थिक चालना मिळू शकते. मात्र या संभाव्य आर्थिक फायद्यांचेही वस्तुनिष्ठ मूल्यमापन होणे गरजेचे आहे.*

लोकशाही व्यवस्थेत सार्वजनिक पैशाच्या वापराबाबत प्रश्न विचारणे हे कोणत्याही धर्माच्या किंवा परंपरेच्या विरोधात जाणे नाही. उलट, सार्वजनिक निधीचा योग्य वापर व्हावा यासाठी प्रश्न विचारणे ही नागरिकांची जबाबदारी आहे.*

सरकारने जर या आराखड्यातील मोठा हिस्सा कायमस्वरूपी पायाभूत सुविधांसाठी असल्याचे स्पष्ट केले असेल, तर त्या कामांचा तपशील सार्वजनिक करण्यास कोणतीही अडचण नसावी. उलट, सविस्तर माहिती सार्वजनिक झाल्यामुळे गैरसमज दूर होतील आणि चांगल्या कामाचे श्रेयही सरकारला अधिक स्पष्टपणे मिळेल.

नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा हा शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये दीर्घकालीन सुधारणा घडवून आणण्याची संधी ठरू शकतो. या संधीचा उपयोग केवळ काही दिवसांच्या धार्मिक आयोजनासाठी न होता पुढील अनेक दशकांसाठी नाशिकच्या विकासाला चालना देण्यासाठी झाला, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. परंतु त्यासाठी नियोजन, निविदा प्रक्रिया, खर्च, कामांची गुणवत्ता, वेळेचे व्यवस्थापन आणि प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचा उपयोग या सर्व बाबींमध्ये पारदर्शकता आवश्यक आहे. मोठा निधी खर्च होतो आहे म्हणून मोठा विकास आपोआप घडतो असे नाही. विकासाची खरी कसोटी म्हणजे खर्च झालेल्या पैशातून नागरिकांच्या जीवनात किती आणि किती काळ टिकणारा बदल झाला.*

कुंभमेळा संपल्यानंतर नाशिककडे उत्तम रस्ते, सक्षम पाणीपुरवठा, प्रभावी सांडपाणी व्यवस्था, सुधारलेली वाहतूक, चांगल्या आरोग्य सुविधा आणि स्वच्छ पर्यावरण उरले, तर एवढ्या मोठ्या सार्वजनिक गुंतवणुकीचे सार्थक झाले असे म्हणता येईल. परंतु मोठ्या खर्चानंतरही कामे अपूर्ण राहिली, निधीचा अपेक्षित परिणाम दिसला नाही किंवा नंतर चौकशी आणि गैरव्यवहाराचे प्रश्न निर्माण झाले, तर त्या खर्चाच्या औचित्यावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.*

म्हणूनच कुंभमेळ्याला विरोध करण्याचा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो सार्वजनिक निधीच्या जबाबदार वापराचा.*

श्रद्धेचा सन्मान राखतानाच सार्वजनिक पैशाबाबत उत्तरदायित्वाची अपेक्षा ठेवता येते. धर्म आणि पारदर्शकता हे परस्परविरोधी विषय नाहीत. उलट, एवढ्या मोठ्या धार्मिक आणि सांस्कृतिक आयोजनाला जर पारदर्शक प्रशासनाची जोड मिळाली, तर तो देशासमोर सुशासनाचा आदर्शही निर्माण करू शकतो. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी होणाऱ्या हजारो कोटी रुपयांच्या खर्चाबाबत सरकारने सविस्तर आराखडा, कामनिहाय खर्च, निधीचे स्रोत, निविदा प्रक्रिया आणि कामांची सद्यस्थिती नागरिकांसमोर ठेवावी. कुंभमेळ्याच्या निमित्ताने होणारी प्रत्येक मोठी गुंतवणूक भविष्यातील नाशिकच्या विकासाशी जोडली जावी, हीच अपेक्षा.

कुंभमेळा श्रद्धेचा उत्सव आहे; परंतु त्यासाठी खर्च होणारा पैसा सार्वजनिक आहे. त्यामुळे श्रद्धेला विरोध न करता हिशेब मागणे ही लोकशाहीचीच भूमिका आहे.*

कारण श्रद्धा वैयक्तिक असू शकते; पण सार्वजनिक पैसा हा जनतेचा असतो.

**सुनीलराव जवंजाळ पाटील**

# पदवीधर शिक्षक वेतनश्रेणीसाठी AMUSS टीम जालनाचा पाठपुरावा; मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कांवरीया यांची सकारात्मक भूमिका

*उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पात्र शिक्षकांना वेतनश्रेणीचा लाभ देण्याची मागणी; प्रश्न लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन*

**जालना । प्रतिनिधी**
प्राथमिक विभागातील पात्र पदवीधर शिक्षकांना पदवीधर/विषय शिक्षक वेतनश्रेणीचा लाभ मिळावा तसेच नुकताच निकाल लागलेल्या पात्र शिक्षकांनाही तातडीने वेतनश्रेणी बहाल करण्यात यावी, या मागणीसाठी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना (), जालना यांच्या वतीने सोमवारी (२४ ऑगस्ट) जिल्हा परिषद जालना येथे प्रभावी पाठपुरावा करण्यात आला. या संदर्भात टीमने जिल्हा परिषद जालनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कांवरीया यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आणि निवेदन सादर केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रश्न लवकर मार्गी लावण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले.



संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने संबंधित याचिकांमध्ये पात्र शिक्षकांना विषय शिक्षक वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. या आदेशाच्या पार्श्वभूमीवर पात्र शिक्षकांना न्यायालयीन निर्देशानुसार वेतनश्रेणीचा लाभ मिळावा, अशी मागणी करण्यात आली.
तसेच मागील महिन्यात निकाल लागलेल्या सर्व पात्र पदवीधर शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्नही तातडीने निकाली काढावा, अशी मागणी AMUSS च्या वतीने करण्यात आली.
यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कांवरीया यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशांचा विचार करून संबंधित याचिकाकर्त्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न लवकर मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे संघटनेने सांगितले.
पदवीधर शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न केवळ न्यायालयीन पातळीवर न ठेवता, आदेशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत प्रशासकीय स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्याची भूमिका AMUSS ने घेतली आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष जावेद खान म्हणाले, ''न्यायालयीन (पान २ वर)

## गणेश देशमाने यांचे निधन

**मंठा - प्रतिनिधी**
मंठा शहरातील रहिवासी तथा रायपूर, ता. सेलू येथील जिल्हा परिषद शाळेचे कार्यरत मुख्याध्यापक आणि सर्वांचे जिव्हाळ्याचे मार्गदर्शक गणेश कामाजी देशमाने सर (वय ५१) यांचे रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने मंठ्याच्या सामाजिक व शिक्षक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या देशमाने सरांनी अनेकांना मार्गदर्शन व दिशा दिली. साधेपणा, स्पष्टवक्तेपणा, संवेदनशीलता, मिश्किल स्वभाव आणि माणुसकीचा जिव्हाळा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ठळक वैशिष्ट्ये होती. वयाने कमी आणि विचारांनी सदैव तरुण असलेल्या देशमाने सरांनी नव्या पिढीतील सामाजिक कार्यकर्त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले.प्रेमळ मार्गदर्शन आणि आपुलकीच्या स्वभावामुळे विविध क्षेत्रांतील असंख्य व्यक्तींशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. मंठ्याच्या सामाजिक चळवळीतील समाजमनाशी नाते जोडणारे एक संवेदनशील व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना त्यांच्या निधनानंतर व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात माता-पिता, पत्नी, दोन मुली, जावई आणि मुलगा असा परिवार आहे.देशमाने सरांच्या अंत्यसंस्काराचा विधी मंठा येथील बौद्ध स्मशानभूमीत बुद्ध धम्म पद्धतीने करण्यात आला. यावेळी राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, पत्रकारिता, साहित्य, सांस्कृतिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार, नातेवाईक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कोल्हापूरात तेली समाजाचा भव्य मेळावा उत्साहात संपन्न

मुंबई - २४ ( महादेव गोळवसकर) महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा संघटनेने काल, रविवार दिनांक २३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत नष्टे लॉन, बसंत बहार रोड, उद्योग भवन समोर, न्यु शाहुपुरी, कोल्हापूर येथे तेली समाजाचा भव्य निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला होता.यावेळी नामदार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,माजी मंत्री विजय वडेट्टीवार, अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, डॉ.भूषण कर्डिले, गजानन शेलार, अशोक व्यवहारे, संजय विभूते, बळवंत मोरघडे आदी उपस्थित होते.प्रमुख पाहुणे चंद्रशेखर बावनकुळे आणि विजय वडेट्टीवार यांनी तेली समाजाच्या उत्कर्षासाठी, उन्नतीसाठी सर्वोतोपरी दिलेल्या १८ मागण्यांसाठी शासनाकडून प्रयत्न करून सोडविणार असे मेळाव्यात जाहीर केले.तेली समाजाचे थोर संत श्री संताजी जगनाडे महाराजांच्या सुदूंबरे तिर्थक्षेत्राचा विकास करणे, मुंबईसह प्रत्येक जिल्ह्यात संताजी जगनाडे महाराज भवन उभारणे, श्री संत संताजी जगनाडे महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजातील तरुणांना रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे, दफनासाठीही जागा उपलब्ध करून देणे इत्यादी विषयावर दोघांनीही सडेतोड भूमिका स्पष्ट केली.अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तांनी सुट्या तेल विक्री वर निर्बंध घातल्याने या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करून मार्ग काढू असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले.पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील तेली समाज बांधव - भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.मेळाव्याचे प्रास्ताविक संजय विभूते आणि आभार निलेश संकपाळ यांनी मानले.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई, ९८६९४७६२०९**

## मागासवर्गीयांच्या आर्थिक विकासासाठी विविध कर्ज योजना; पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**
: महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक विकासासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, कौशल्य प्रशिक्षण विकास योजना, महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना, बीजभांडवल योजना तसेच थेट कर्ज योजना आदी विविध योजना राबविण्यात येतात.
जालना जिल्ह्यात संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, जगज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ, संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ, संत श्री संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ, संत श्री रूपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ, स्व. विष्णुपंत रामचंद्र दादरे (लोणारी) आर्थिक विकास महामंडळ, सोळा कुळस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ, श्री संत शिरोमणी नामदेव महाराज समस्त शिंपी समाज आर्थिक विकास महामंडळ, संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ, लेवा पाटीदार समाज आर्थिक विकास महामंडळ, सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज आर्थिक विकास महामंडळ आणि आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ यांच्या माध्यमातून विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांसाठी पात्र लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांसह .. या वेब पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करणे अनिवार्य आहे. अधिका माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना दूरध्वनी क्र. ०२४८२-२२३४२० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. जालना यांनी केले आहे.

## परतूर येथे २६ ऑगस्टला इस्कॉनतर्फे 'श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सव'; विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**परतूर - प्रतिनिधी**
आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन, जालना) यांच्या वतीने बुधवार, दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सव-२०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. शहरात वरद विनायक मंगल कार्यालय, मेन रोड, परतूर येथे हा भक्तिमय सोहळा संपन्न होणार आहे.
कार्यक्रमात प्रमुख कथावाचक म्हणून श्रीमान प्राणगोपीनाथ दास (प्रभुजी)(ब्रह्मचारी, इस्कॉन मंदिर चौपाटी मुंबई - . .) यांचे अध्यात्मिक निरूपण लाभणार आहे. तसेच श्रीमान रासगोविंद दास (प्रभुजी) (मॅनेजर, इस्कॉन जालना - , , , , ) यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे.
दिवसभराचे विशेष वेळापत्रकः



नगर संकीर्तन:सकाळी ०९:०० ते ११:००
सांस्कृतिक कार्यक्रमः दुपारी ०३:०० ते ०४:०० अभिषेक: दुपारी ०४:०० ते ०५:०० प्रवचन:सायंकाळी ०५:०० ते ०६:०० महाआरती: सायंकाळी ०६:०० ते ०६:३०
महाप्रसाद:रात्री ०६:३० ते ०८:३० याशिवाय, दर गुरुवारी सायंकाळी ०६:३० ते ०८:३० या वेळेत हरे कृष्ण सत्संग केंद्र, ऑफिस समोर, मेन रोड, परतूर येथे नियमित सत्संग व महाप्रसादाचे आयोजन केले जाते. हा भव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इस्कॉनचे विजय भैय्या राऊत, कैलासजी चव्हाण, सचिन काटे, सावता काळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व भाविक अथक परिश्रम घेत आहेत.
या महामहोत्सव प्रसंगी सर्व भाविकांनी सहपरिवार व इष्टमित्रांसह उपस्थित राहून भगवान श्रीकृष्णाच्या आशीर्वादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉन परतूरचे अध्यक्ष कृष्णा सोनवणे, आणि उपाध्यक्ष वीरराघव दास प्रभुजी, यांनी केले आहे.

## काँग्रेसच्या जालना अंबड बदनापूर येथील संवाद सभा उत्साहात

### जनतेची फसवणूक करणाऱ्या सरकारला धडा शिकवा - खा. डॉ. कल्याण काळे

**जालना - प्रतिनिधी**
जालना अंबड बदनापूर तालुक्यात काँग्रेसच्या संघटनात्मक आढावा व संवाद सभा पार पडल्या.
खासदार डॉ. कल्याण काळे त्यांनी मार्गदर्शन करताना काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्यानंतर देशाला स्वावलंबी व आत्मनिर्भर करण्याचे काम केले. देशातील मूलभूत सुविधा साधन संपत्तीची उभारणी ही काँग्रेसच्या कार्यकाळातच झाली असल्याचे सांगितले. भारतीय जनता पक्षाने लोकांची दिशाभूल करून व त्यांना खोटी आश्वासने देऊन मागील बारा वर्षांपूर्वी सत्ता हस्तगत केली. परंतु त्यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कुठल्याही विकास किंवा काम केलेले नाही व लोकांची फसवणूकच केली. फसवणूक करणाऱ्या या सरकारला धडा शिकवा व येणाऱ्या काळात जनतेने सर्वांगीण विकासासाठी काँग्रेस पक्षाच्या पाठीशी राहून येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मोठा विजय मिळवून




द्यावा अशी आवाहन याप्रसंगी केले. यावेळी मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री कल्याण दळे यांनी सांगितले की काँग्रेस पक्षामध्ये अनेक पदाधिकारी कार्यकर्ते प्रवेश करण्यासाठी इच्छुक आहेत परंतु सरसकट प्रवेश न देता पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्ता व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊनच इतर पक्षातील कार्यकर्त्यांना प्रवेश देण्यात येतील. त्याचप्रमाणे नव तरुणांना यापुढे पक्षामध्ये संधी देण्यात येईल. पक्षाचे ध्येय धोरण, विचार व पक्षनिष्ठा याविषयी कुठली तडजोड स्वीकारली जाणार नाही.
यावेळी ठिकठिकाणी कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला या कार्यकर्त्यांचे खासदार डॉ. कल्याण काळे जिल्हाध्यक्ष श्री कल्याण दळे व तालुकाध्यक्ष यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. या वेळी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख प्रदेश सरचिटणीस राम कुऱ्हाडे, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, ज्ञानेश्वर भांदरगे, प्रभाकर मामा पवार,अल्पसंख्यांक विभागाचे बदर चाऊस, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष कोळकर, अविनाश चव्हाण, रामकिसन शिंदे, अशोक उबाळे, राजाभाऊ कुलकर्णी,योगिता धांडगे, यांची समायोजित भाषणे झाली. यावेळी कार्यक्रमास प्रमुख उपस्थितीत तालुका अध्यक्ष (पान २ वर)

## मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील ३१ विद्यार्थ्यांची इंटर्नशिपसाठी निवड

### मशीन लर्निंग व अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्तेतील ६ आठवड्यांची इंटर्नशिप; विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षणाची संधी

**जालना - प्रतिनिधी**
मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागातील तब्बल ३१ विद्यार्थ्यांची मशीन लर्निंग आणि अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता इंटर्नशिप २०२६ साठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.
भारत केअर्स यांच्या माध्यमातून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद () आणि यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या ६ आठवड्यांच्या इंटर्नशिपमध्ये विद्यार्थ्यांना मशीन लर्निंग आणि अनुप्रयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता () या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.
या इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांना कृतीवर




आधारित शिक्षण, वास्तविक जगातील प्रकल्पांवर काम करण्याचा अनुभव, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि उद्योगक्षेत्रात मान्यताप्राप्त प्रमाणपत्रे मिळणार आहेत. यासोबतच विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानातील कौशल्ये विकसित करून भविष्यातील करिअरच्या विविध संधींसाठी स्वतःला सक्षम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्राचे मा. आरोग्यमंत्री तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. राजेश टोपे, सचिव सौ. मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड आणि सहायक प्रशासकीय अधिकारी श्री. राहुल भालेकर यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, ''आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानातील कौशल्ये विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल करिअरसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. सारख्या जागतिक स्तरावरील संस्थेशी संबंधित इंटर्नशिपसाठी ३१ विद्यार्थ्यांची निवड होणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.''
विभागप्रमुख प्रा. एस. एन. गिते यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून सांगितले की, विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता उद्योगाच्या बदलत्या गरजांनुसार आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभव देण्यावर विभागाचा विशेष भर आहे. या इंटर्नशिपमुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानाबरोबरच त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांना आणि रोजगारक्षमतेला निश्चितच चालना मिळेल.
ट्रेनिंग ऑफिसर प्रा. कृष्णा ताठे यांनीही निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. भविष्यात विद्यार्थ्यांना नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये इंटर्नशिप तसेच रोजगाराच्या अधिकाधिक (पान २ वर)

## आई-वडिलांचा आदर करा, तुमच्या जीवनात काहीच कमी पडणार नाही - हभप विलास महाराज बागल

**जालना -प्रतिनिधी**
देवाचा, संताचा आणि गुरूचा, तसेच आई-वडिलांचा अवमान करू नका त्यांचा आदर करा तुमच्या जीवनात काहीच कमी पडणार नाही असे प्रतिपादन अमृतानुभव कंठ भूषण हभप विलास महाराज बागल आळंदीकर यांनी अंबड रोडवरील यशवंतनगर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे श्रावण मासानिमित्त आयोजित अमृतानुभव विस्तार प्रवचनात बोलतांना केले पुढे बोलतांना महाराज म्हणाले की ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण केल्याने माणसाच्या बुद्धीत ज्ञान प्राप्त होते तसे अमृतानुभव प्रवचन श्रवणाने माणसाला जीवन जगण्याचा अनुभव मिळतो, प्रत्येक ठिकाणी प्रत्येक गोष्टीत परमात्मा आहे अति सूक्ष्म वस्तुत ही परमात्मा आहे, जेथे रूप आहे तेथे नाव आहे, नाम रूपाला सत्ता आहे, संसारात कोणतीही गोष्ट करावयाची असेल तर पती-पत्नीच्या विचाराशिवाय होत नाही, प्रकृती आणि जीव हे एकमेकांशी संलग्न आहेत, आत्म्याच्या ठिकाणी आत्मा आहे सर्वांच्या ठिकाणी एकच आत्म्याचा अवशेष आहे, अर्धे जग स्त्रीयाचे आहे आणि अर्धे जग पुरुषाचे आहे, दोघेही एकमेकांचे विषय आहेत, ते विशी आणि विषय आहेत पत्नी विशी आहे आणि पती विषय आहे, स्त्रि आणि पुरुष यांना नाम रूपानेच भेद आहे स्त्रीमध्ये ही शिव आहे आणि पुरुषांमध्ये शिव आहे, सत्त चित्त आणि आनंद हे ब्रह्माचे पदार्थ आहेत, ज्ञान प्राप्त झाले की अज्ञान राहत नाही तसे प्रकाश झाला तर अंधार राहत नाही, कोणतेही कार्य करतांना निष्ठा भाव प्रेम असेल तर ते कार्य सिद्धीस जाते, अद्वैत परमात्म्याचे स्वरूप आपल्याला कळणार (पान २ वर)



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.